
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2018
सकाळ



कोल्हापूर : बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे शनिवारी आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. वाय. व्ही. रेड्डी. यावेळी डावीकडून उषा थोरात, डॉ. देवानंद शिंदे.

# घोटाळे करणाऱ्यांना आर्थिक दंड आवश्यकच

## डॉ. रेड्डी; बँकांची सुरक्षितता यावर व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : बँकांमध्ये घोटाळे करणाऱ्यांना केवळ शिक्षा नको, तर त्यांना आर्थिक दंडही करायला हवा, असे स्पष्ट मत रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाय. व्ही. रेड्डी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासन केंद्रातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'बँकांची सुरक्षितता' या विषयावर त्यांनी संवाद साधला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात प्रमुख उपस्थित होत्या.

व्याख्यानाच्या सुरवातीलाच लेफ्टनंट जनरल एसपीपी थोरात यांना डॉ. रेड्डी यांनी अभिवादन केले. ते म्हणाले, "नागरी बँकांचे संचालन दोन स्तरांवर चालते. एकीकडे रिझर्व्ह बँक आणि दुसरीकडे राज्य सरकारचेही त्यावर नियंत्रण असते. त्यामुळे चांगल्या बँकांना प्रोत्साहन, अडचणीतील बँकांना मदत आणि चांगल्या नाहीत त्या बंद करण्याची भूमिका रिझर्व्ह बँकेला राज्य सरकारकडून अपेक्षित असते. २००८ मध्ये जगभरातील अनेक बँका अडचणीत आल्या. मात्र, देशातील बँका टिकून राहिल्या."

बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे यांचा या वेळी सत्कार झाला. अध्यासन प्रमुख डॉ. व्ही. जी. ककडे यांनी आभार मानले. 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. बी. पाटील, अभय गांधी, बाळ पाटणकर, रवी शिराळकर, किरण कर्नाड आदी उपस्थित होते.

10 JUN 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बँकांना आर्थिक शिस्त नाही

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'अलिकडे सार्वजनिक, खासगी क्षेत्रातील बँकांत आर्थिक शिस्त राहिली नसल्याने सध्या काही सरकारी बँकातही घोटाळे उघडकीस आले आहेत.बँकेत आर्थिक घोटाळे करणाऱ्यांना केवळ शिक्षा करून चालणार नसून आर्थिक दंड ठोठावला पाहिजे,' अशी अपेक्षा भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाय. व्ही.

**रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रेड्डी यांची टीका**

अर्जुन टाकळकर



शाहू स्मारक भवनात बोलताना भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाय. व्ही. रेड्डी. यावेळी उषा थोरात, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

रेड्डी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे 'बँकाची सुरक्षितता' आयोजित विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. राजर्षी शाहू स्मारक भवनात व्याख्यान झाले.

डॉ. वाय. व्ही. रेड्डी म्हणाले, 'सरकारी, खासगी बँकांत घोटाळे झाल्यास त्याची चौकशी सुरू केली जाते. अनेक प्रकारच्या समिती नेमल्या जातात. घोटाळ्याचे प्रकरण आरबीआयपर्यंत जाते. त्यांना शाखा विस्तार, भरती बंदी, कर्जवाटप आणि ठेवी घेण्यास बंदी घातली जाते. मात्र मूळ घोटाळे करणारे मात्र नामानिराळे राहतात. घोटाळ्यात बँकेतील काही कर्मचारी, अधिकारी सहभागी असू शकतात. या घोटाळा बहाद्दारांना केवळ शिक्षा करून चालणार नाही. त्यांना मोठा आर्थिक दंड ठोठावला पाहिजे. भांडवल पर्याप्त उपलब्ध असल्याने सरकारी बँका सक्षम आहे. मात्र खासगी, नागरी क्षेत्रातील बँकांत घोटाळ्याचे प्रमाणही वाढले आहे. काही बँकांची धोरणे नियोजनशून्य असल्याने ग्राहकांच्या ठेवींचा प्रश्न निर्माण झाला आहे. बँकांत आत्मविश्वास, पारदर्शी आणि ग्राहकाभिमुख सेवा दिल्यास अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी येणार आहे. सध्या कोणत्याही बँकांत ठेवी शंभर टक्के सुरक्षित आहेत, असे ठामपणे सांगता येणार नाही. गुंतवणूक करताना गुंतवणूकदारांनी चौकसपणे राहिले पाहिजे. म्युच्युअल फंडासह बँकांतील विविध योजनांतील गुंतवणुकीत जोखीम असून फायदाही आहे. मात्र गुंतवणूक करताना विचारपूर्वक करण्याची गरज आहे. निश्चित ठोस धोरण नसल्याने अनेक बँका अडचणीत आल्या. काही बँकांचे सक्षम धोरण आहे, मात्र त्याची अंमलबजावणी केली जात नाही. बँकांनी ग्राहकांचा विश्वास अधिकाधिक संपादन करण्यासाठी ग्राहकांना विश्वासात घेण्याची गरज आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी कोल्हापूरची अर्थव्यवस्था आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली.

यावेळी रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे उपस्थित होते. नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात, नागरी बँक्स असोसिएशनचे किरण कर्नाड, सायबरच्या विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची डॉ. रेड्डी यांनी उत्तरे दिली.

10 JUN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बँक घोटाळेबहाद्दरांना आर्थिक दंड आवश्यक


## वाय. व्ही. रेड्डी : शिवाजी विद्यापीठात बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बँकांमध्ये घोटाळे करणाऱ्यांना केवळ शिक्षा पुरेशी नसून, त्याबरोबरच त्यांना आर्थिक दंड करणे आवश्यक असल्याचे मत रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाय. व्ही. रेड्डी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे आयोजित व्याख्यानावेळी ते बोलत होते.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथे शनिवारी सायंकाळी झालेल्या या व्याख्यानाच्या अध्यक्षपदी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी व्यासपीठावर रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. रेड्डी यांनी 'बँकांची सुरक्षितता' या विषयावर आपले विचार मांडले.

नसीर अत्तार



कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे शनिवारी रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाय. व्ही. रेड्डी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

डॉ. रेड्डी म्हणाले, बँकामध्ये ठेवी ठेवताना नागरिक सर्वे बाजूंनी विचार करतात. १०० टक्के ठेवी सुरक्षित आहेत, असे म्हणता येत नसले तरी त्या नाहीत असेही म्हणता येत नाही. २००१ साली अनुत्पादित कर्जाचे प्रमाण आतापेक्षा खूपच जास्त होते. मात्र नंतर त्यामध्ये सुधारणा होत गेल्या.

जगभरामध्ये २००८ मध्ये आर्थिक संकटामध्ये अनेक बँका अडचणीत आल्या तेव्हासुद्धा भारतातील बँका टिकून राहिल्या, याची आठवण करून देत डॉ. रेड्डी यांनी यासाठीची आपली आधीपासूनच तयारी होती असे नमूद केले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रास्ताविक केले. त्यांच्या हस्ते यावेळी डॉ. रेड्डी आणि बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. अध्यासन प्रमुख डॉ. व्ही. बी. ककडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंत थोरात, व्ही. बी. पाटील, अभय गांधी, बाळ पाटणकर, रवी शिराळकर, किरण कर्नाड, आदी मान्यवर उपस्थित होते.

### एसपीपी थोरात यांना अभिवादन !

व्याख्यानाच्या सुरुवातीलाच डॉ. रेड्डी यांनी ले. जनरल एसपीपी थोरात यांना अभिवादन केले. चीनबाबत या कोल्हापूरच्या सुपुत्राने दिलेला सल्ला मानला नाही आणि त्याची किंमत आपल्याला चुकवावी लागली, असे ते म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
10 JUN 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथ कॉर्नरतर्फे पुस्तक प्रदर्शन सुरू

**कोल्हापूर, ता. ९ :** साहित्याच्या सर्व प्रकारातील दुर्मिळ तसेच नवीन पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी ग्रंथ कॉर्नरच्या पुस्तक प्रदर्शनाच्या निमित्ताने खुला झाला. आज शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शाहू स्मारक भवन येथील पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. हे प्रदर्शन २८ जूनपर्यंत सर्वांसाठी खुले आहे.



**कोल्हापूर : ग्रंथ कॉर्नरच्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन देवानंद शिंदे यांनी केले. शेजारी कृष्णाजी हरगुडे, युवराज कदम, प्रभाकर पाटील, अलोक जत्राटकर, सुभाष पाटील आदी.**

ग्रंथ कॉर्नरने नेहमीच चोखंदळ वाचकांना नवनवीन योजनांच्या माध्यमातून पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. प्रदर्शनात सुमारे दीड लाखाहून अधिक पुस्तके आहेत. त्यात कथा-कादंबरी, अनुवादित साहित्य, अध्यात्म, व्यक्तिमत्त्व, ऐतिहासिक, विज्ञान, शेती, आरोग्य, पर्यटन यासह विविध क्षेत्रांतील पुस्तकांचा समावेश आहे. हे प्रदर्शन २८ जूनपर्यंत सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत खुले राहील. या प्रदर्शनात १० ते २५ टक्के सवलत मिळणार आहे. याचा लाभ वाचकांनी, शाळांनी आणि सार्वजनिक ग्रंथालयांनी घ्यावा, असे आवाहन संचालिका शुभांगी पाटील यांनी केले. या वेळी अलोक जत्राटकर, प्रभाकर पाटील, कृष्णाजी हरगुडे, सुभाष पाटील आदी उपस्थित होते.

10 JUN 2018 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. श्रीरंग यादव यांना जानकी अमल राष्ट्रीय पुरस्कार

प्रतिनिधी, कोल्हापूर

**केंद्रीय पर्यावरण**, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांच्यामार्फत वनस्पती वर्गीकरण शास्त्रातील कामगिरीबद्दल दिला जाणारा ई. के. जानकी अमल हा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. श्रीरंग रामचंद्र यादव यांना जाहीर झाला . केंद्रीय मंत्री हर्षवर्धन यांच्या हस्ते तो त्यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार मिळविणारे डॉ. एस. आर. यादव हे महाराष्ट्रातील एकमेव शास्त्रज्ञ आहेत. २०१६ साली निवृत झाल्यानंतरही त्यांनी त्यांचे संशोधनाचे काम सुरूच ठेवले. यासाठी त्यांना यूजीसीने शिष्यवृत्ती दिली असून ते सध्या शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागात सल्लागार आहेत. त्यांचे आजपर्यंत २०० पेक्षा अधिक शोधनिबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या नावावर ८ संशोधनात्मक ग्रंथ असून प्रामुख्याने वनस्पती वर्गीकरण आणि वनस्पतीची गुणसूत्र यावर त्यांनी विशेष संशोधन केले आहे. भारतीय उपखंडातील गवतवर्गीय वनस्पस्पतींचे तज्ज्ञ म्हणून त्यांची जगभर ख्याती आहे. याबरोबरच पश्चिम घाटातील दुर्मिळ, प्रदेशनिष्ठ आणि लुप्त होत चाललेल्या वनस्पतींच्या संवर्धनामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि वनस्पतिशास्त्रातील कार्यकर्तृत्वामुळे शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाचे उद्यान हे पश्चिम भारतातील पहिले अग्रणी वनस्पती उद्यान म्हणून नावारूपाला आले.

## शिवाजी विद्यपीठातर्फे सत्कार

या सवोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल शुक्रवारी शिवाजी विध्यापिठात त्यांचा कुलगुरूंच्या सत्कार करण्यात आला . कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रा. एस.आर. यादव यांची संशोधनाप्रती समर्पण वृत्ती आणि निष्ठा ही अत्यंत आदर्शवत आहे . त्यांना मिळालेला राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार हा शिवाजी विद्यपीठाचाच गौरव आहे, असे गौरवोद्गार काढले. यावेळी डॉ. यादव म्हणाले,माझे संशोधन क्षेत्र असलेल्या टॅक्सॉनॉमीला जीवशास्त्रची माता असे म्हटले जाते. त्या क्षेत्रात गेल्या तीस वर्षींत उत्तम संशोधनाची भर घालण्याचे कार्य हातून झाले, याचे समाधान आहे .

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2018
पुढारी

# विद्यापीठ ऑनलाईन प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर

■ उद्या गुणवत्ता यादी जाहीर

■ १९ जूनपासून प्रवेश प्रक्रिया

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी एम.एस्सी. व इतर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन पदवी व पदव्युत्तर व संलग्न महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. गुणवत्ता यादी सोमवारी जाहीर केली जाणार आहे.

विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दि. २२ ते २९ मे या कालावधीत प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. प्रवेशासंदर्भात १९ जूनपासून राऊंड सुरू होणार आहेत. दि. १९ जून रोजी केमिस्ट्री अभ्यासक्रमाच्या उपलब्ध जागा जाहीर केल्या जातील. दुसऱ्या दिवशी (दि. २०) प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. दि. २२ जूनला दुसऱ्या राऊंडच्या रिक्त जागा जाहीर होतील. तसेच २५ जून रोजी प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया होणार आहे. इतर विद्यापीठ कोट्यातील जागा उपलब्धतेनुसार स्पॉट अॅडमिशनची प्रक्रिया तिसऱ्या राऊंडमध्ये २६ व २७ जून रोजी होणार आहे. विद्यार्थ्यांनी सविस्तर माहितीसाठी www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील लिंक 'Admission2018' पाहावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

10 JUN 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बापूजींनी शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण भागापर्यंत पोहोचविली

**शिक्षणमंत्री विनोद तावडे**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनी सुरू केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमुळे शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. त्यामुळे ग्रामीण भागातील गुणवत्तेला संधी मिळाली, असे उद्‌गार शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी काढले. ते श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी कार्यक्रम ताराबाई पार्क येथील संस्था कार्यालय परिसरात पार पडला, त्यावेळी महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

तावडे म्हणाले, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आपण अभिनंदन केले पाहिजे, त्यांनी बापूजींचा वारसा जपला आहे. शिक्षणावर आपलाच हक्क आहे, असे काही जण समजत होते; मात्र कर्मवीर भाऊरावआण्णा पाटील, डॉ. बापूजी साळुंखे यांच्यासारख्या लोकांमुळे ग्रामीण भागातील लोकांची शिक्षणाची सोय झाली. ग्रामीण भागात गुणवत्ता आहे, हे त्यांनी ओळखले होते.

शिक्षणमंत्री झाल्यापासून शिक्षण पद्धतीत बदल करत आहे. बदलांना सुरुवातीला विरोध होतो; मात्र ते बदल यशस्वी होतात. दर्जा सुधारण्यासाठी विद्या प्रतिष्ठान आणि बालभारती एकत्र आणले आहेत.

कोल्हापुरातील २५ पटसंख्येच्या शाळांचा पट वाढवण्यासाठी जिल्ह्यात पायलट प्रकल्प राबवू. हा प्रयत्न यशस्वी झाल्यास राज्यात राबवण्यात येईल, असे सांगून तावडे म्हणाले, राज्यात शिक्षणाचे वेगवेगळे प्रयोग करत आहोत. हे सर्व प्रयोग यशस्वी झाले आहेत. गणित आणि इंग्रजी कसे सोपे करून शिकवायचे, हे शिक्षकांना सांगणे गरजेचे आहे. दहावीच्या फेरपरीक्षेमुळे ५ टक्के मुले पास होतात. त्यांचे नुकसान होत नाही. पहिल्या वर्षी ३५ हजार मुले पास झाली.

बारावी उत्तरपत्रिका तपासणीवेळी शिक्षकांनी आंदोलन केले. तो त्यांचा अधिकार आहे; मात्र त्यांचा प्रश्न सोडवला. त्यामुळे निकाल ४ दिवस आधी लागला. मी सामान्य घरातून आलो, त्यामुळे सामान्यांच्या व्यथा काय आहेत, या कळतात.

शाहू महाराजांनी जो आदर्श दिला, त्या आदर्शानुसार राज्यातील शिक्षण सुरू आहे. शाहू शताब्दी वर्षासाठी वर्षभर विविध उपक्रम राबवू.

यावेळी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी अहंकार हा मानवाचा नाश करतो. प्रत्येक माणसात परमेश्वर असतो. माणूस जन्माने मोठा नसतो, तो संघर्षानेच यशस्वी होतो. कोणीही अपवादाने यशस्वी होत नाही. मीही पंधरा वर्षांच्या तपश्चर्येने राज्यपाल झालो. बापूजींच्या पाठिंब्यामुळे मी दोन वेळा आमदार झालो. एका वेळी ६४ संस्था निर्माण केल्या. खंबीरपणे उभा राहिल्याने शैक्षणिक चळवळ चालू ठेवू शकलो.

अध्यक्षीय समारोप करताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम करण्याची गरज आहे. कर्मवीर भाऊराव पाटील आणि बापूजी साळुंखे यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविली. बापूजींनी लावलेल्या रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे. यावेळी चंद्रकांतदादांनी संस्थेच्या ३९५ शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा केली. यासाठी समाजातून पैसे उपलब्ध करून देणार असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले. बापूजींच्या जन्मशताब्दीनिमित्त भरीव निधी देऊ, तसेच बापूजींना मरणोत्तर भारतरत्न मिळावा यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली.

प्रास्ताविकात प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, सातारा ही बापूजींची जन्मभूमी असली तरी कोल्हापूर ही त्यांची कर्मभूमी आहे. इतिहास घडवणारे महापुरुष अमर ठरतात. अज्ञान हे समाजाच्या दुःखाचे मूळ कारण आहे, हे ओळखून बापूजींनी शिक्षण प्रसाराचे कार्य केल्याचे त्यांनी सांगितले. बापूजींचा भारतरत्न, पद्मविभूषण देऊन गौरव व्हावा, अशी मागणी केली. महापौर शोभा बोंद्रे यांनी या जन्मशताब्दी महोत्सवाच्या शुभारंभाला शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

**धूल चेहरेपर और मैं आईना पोछता रहा**

सध्या सुरू असलेल्या शिक्षण पद्धतीविषयी माहिती देण्यासाठी शिक्षणमंत्री तावडे यांनी गालीब यांच्या एका शेरचा आधार घेतला. 'एक खता तो मैं जिंदगी भर करता आया, धूल चेहरे पर थी और मैं आईना पोछता रहा,' असे म्हणत त्यांनी यापूर्वी आपण शिक्षण क्षेत्रासाठी केवळ निधी आणि सुविधा देण्याचा विचार करत होतो; मात्र अभ्यासक्रमात मूलभूत बदलाबाबत आपण उदसीन असल्याचे अधोरेखित केले. तसेच 'घोकंपट्टी' करायला लावणारा इयत्ता ६ वी ते १० पर्यंतचा अभ्यासक्रम बदलल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना शाळेत दिल्या जाणाऱ्या गुणांचा अभ्यास केल्याचे त्यांनी सांगितले. त्यामध्ये राज्यातील ९२ टक्के शाळा विद्यार्थ्यांना १८-१९ गुण देत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शाळेकडून मिळणारे २० गुण पुढील वर्षी मिळणार नाहीत. यामुळे आगामी निकाल ७० ते ८० टक्क्यांवर येणार असल्याचे सांगितले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची ओळख व्हावी, यासाठी शनिवारी सकाळी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीत बापूजींच्या आठवणींना उजाळा देणारे चित्ररथ, देखावे यांचा समावेश होता. रॅली दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, दाभोळकर कॉर्नरमार्गे विवेकानंद शिक्षण संस्थेच्या परिसरात दाखल झाली. यावेळी डॉ. बापूजी साळुंखेंचे जन्मस्थान असलेल्या पाटण तालुक्यातील रामापूर येथून निघालेली ज्योतही दाखल झाली. यावेळी महोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

आभार प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मानले. प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी जन्मशताब्दी वर्षामागची भूमिका व नियोजनाविषयी माहिती दिली. कार्यक्रमास राज्यभरातील संस्थेच्या आजी-माजी विद्यार्थ्यांसह शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.




**कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना शिक्षणमंत्री विनोद तावडे. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महापौर शोभा बोंद्रे, कुलगुरू देवानंद शिंदे आदी. दुसऱ्या छायाचित्रात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पोस्ट पाकिटाचे अनावरण करताना मान्यवर.** (छाया : एस. अली)

## यापुढे पारदर्शक प्राध्यापक भरती

प्राचार्यांच्या भरतीवर असलेली बंदी उठवली आहे, त्याचप्रमाणे प्राध्यापकांच्या भरतीवरील बंदीही उठवण्यात येणार आहे. शिक्षकांची भरती केंद्रीय पद्धतीने 'पवित्र' नावाच्या पोर्टलद्वारे घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे येथून पुढे प्राध्यापकांची भरती ही पारदर्शकपणे होणार आहे. नोकरीसाठी एक पैसाही प्राध्यापक आणि शिक्षकांना द्यावा लागणार नाही.

## पोस्ट पाकिटाचे अनावरण

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पोस्ट विभागातर्फे विशेष पोस्ट पाकिटाचे अनावरण करण्यात आले. यावेळी भारतीय डाक विभाग बापूजींना अभिवादन करत असल्याची भावना प्रवर अधीक्षक आय. डी. पाटील यांनी व्यक्त केली. याच कार्यक्रमात जन्मशताब्दी दिनदर्शिका व नियोजन पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात आले.

## विवेकानंद स्वायत्त विद्यापीठ बनावे

राज्यातील विवेकानंद, रयत अशा संस्थांनी अभ्यासक्रमातील बदलांसाठी विद्यापीठावर अवलंबून राहू नये. त्यांचा अभ्यासक्रम, परीक्षा घेण्याचा अधिकार या संस्थांनाच असावा. त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना होईल. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थ्याला शिक्षणाच्या मॉलमध्ये पाहिजे ते घेता आले पाहिजे, असे मत शिक्षणमंत्री तावडे यांनी व्यक्त केले.